For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com
Dowmloaded from SkillCouncils.com

# कुळगांव बदलापूर नगरपरिषद

## महिला व बालकल्याण विभाग

### अटी व शर्ती

**कामाचे नाव :-** बदलापूर हद्दीतील मधील महिलाना ज्यूडो, कराटे, योगा विषयाचे प्रशिक्षण देणे करीता.

१. प्रशिक्षणासाठी लागणारे साहित्य, फर्निचर, विदयुत व्यवस्था व प्रशिक्षणाकरितां जागा उपलब्ध करणेची जबाबदारी संस्थेची राहील.

२ प्रशिक्षण देणेकामी किमान कराटे BLACK BELT परिक्षा उत्तीर्ण प्रशिक्षण अथवा व योगा प्रशिक्षक योगा पदविकाधारक असणे आवश्यक आहे.

३. प्रशिक्षणार्थीस वर्गामध्ये ८०% उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यास परिक्षेस बसण्यात पात्र असतील.

४. प्रशिक्षणार्थीस २ महिने (१८० तास) मुदतीचे प्रशिक्षण देण्यात येईल. तसेच प्रत्येक दिवशी किमान २ तास प्रशिक्षण देणे बंधनकारक राहिल.स

५. प्रशिक्षण देणा-या संस्थेकडे क्रिडा व युवक सेवा संचलनालयाचे प्राधिकृत केलेले प्रशिक्षक असणे आवश्यक आहे.

६. प्रशिक्षण कोर्स प्रशिक्षणार्थीना संस्थेकडून शासन मान्य संस्थेचे प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी संस्थेची राहिल, व नेमणुक केलेल्या शिक्षकांचे शैक्षणिक अर्हता बाबतचे कागदपत्रे या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक असेल.

७. प्रशिक्षणाचा कालावधी पूर्ण झाल्यावर देयक सादर करण्यात येईल. त्यामध्ये आयकर व इतर शासकीय वजाती कपात करण्यात येईल, व त्याबाबत ठेकेदाराची काही हरकत असणार नाही.

८. प्रशिक्षणाची पुर्तता वेळेत न पूर्ण झाल्यास होणा-या गैरसोयीबाबत नगरपरिषदेने केलेल्या कारवाईस ठेकेदार बांधिल राहिल.

९. निविदेतील नमुद प्रशिक्षणार्थी नगरपरिषदेने दिलेल्या आदेशानुसार व नमुद संख्येनुसार प्रशिक्षणार्थीस प्रशिक्षण देण्यात यावे.

१०. कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीमधील प्रभागातील प्रशिक्षणा करिता लाभार्थ्यांना कळविण्याची जबाबदारी संस्थेची राहिल.

११. प्रशिक्षणार्थीची यादी करताना प्रथम येणा-यास प्राधान्यक्रमाने प्राप्त कागदपत्रे व अर्ज ग्राहय धरले जातील.

१२. प्रशिक्षणार्थीनी अर्जा सोबत शाळेचा दाखला, वास्तव्याचा पुरावा (रेशन कार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड, घरपट्टी पावती तत्सम.) प्रती व अर्जासोबत फोटो आवश्यक राहिल.

१३. प्रशिक्षणार्थीने जोडलेले कागदपत्रे खोटे अथवा निकषबाहय आढळल्यास त्याबाबत संस्थेवर दंडात्मक कारवाई करण्यास आमची कूठल्याही प्रकारे हरकत नूसन त्याबद्दल येणा-या दंडात्मक रक्कमेस नुकसान भरपाई देण्यास संस्था बांधिल राहिल.

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com
Downloaded from SkillCouncils.com

१४. निविदा अनामत रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम यावर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

१५. निविदेचे देयक निधी उपलब्धते नुसार अदा केले जाईल.

१५. निविदेतील दराबाबत नगरपरिषदेच्या शासकीय लेखा परिक्षणात काही वसुली व ऑडीट आक्षेप निघाल्यास ती रक्कम मंजुर ठेकेदार यांचेवर रोखीने भरणे बंधनकारक राहील. अन्यथा सुरक्षा अनामत रक्कमेमधून कपात करण्यात येईल वा इतर नियमानुसार वसुल करण्यात येईल. संबंधित देयकांचे संपुर्ण लेखापरिक्षण झाल्यानंतर सुरक्षा अनामत अदा करण्यात येईल.

१६. प्रस्तावित दराच्या एकुण रक्कमे व्यतिरिक्त कोणतीही रक्कम वाढविणेंत येणार नाही.

१७. लाभार्थी यांची प्रशिक्षण यशस्वी पूर्ण केले नंतर व प्रमाणपत्र प्रदान केल्यानंतर देयक अदा करण्यात येईल.

१८. सदर प्रशिक्षणास शासनाकडून अनुदान मिळालेले नाही, यांचे प्रमाणपत्र सादर करणे संस्थेस बंधनकारक राहिल.

१९. करारनाम्याची अंमलबजावणी कार्यादेशापासून ४५ दिवसाच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील.

२०. संस्थेकडे शासकीय थकबाकी नसल्या बाबत लेखी हमी देणे बंधन कारक राहील.

२१. लाभार्थी निवडताना सर्व सामाजिक, आर्थिक स्तरातील लोकांचा विचार करण्यात यावा, त्यामध्ये अनुसुचित जाती/जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय यांचे अर्ज प्राप्त झाल्यास अशा अर्जांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच, नगरपरिषदेने पुरविलेल्या यादीला प्राधान्य देणेत यावे.

२२. जिल्हा कौशल्य विकास केंद्र येथे सदर उमेदवार यांना नोंदणीसाठी मार्गदर्शन करण्यात यावे.

२३. ठेकेदाराने निविदा अटी व शर्ती वाचाव्यात व त्यांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी, झाल्यास त्यापासून होणा-या परिणांमास ठेकेदार जबाबदार राहील.

२४. सदर कामाच्या करारनाम्यामध्ये वेळोवेळी शासनाकडून मिळणारे मार्गदर्शक सुचना, निर्देश/आदेशा नुसार वदल करण्याचे अधिकार मुख्याधिकारी (कुबनप) यांना असतील. तसेच प्रशासकीय कारणास्तव सदरचा करारनामा मध्ये बदल तसेच रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवले आहेत. त्याबाबत संस्थेला कोणत्याही प्रकारची तक्रार असणार नाही व याबाबत कोणतेही मा.न्यायालयात सदर बाबत तक्रार किंवा दावा दाखल करता येणार नाही.

२५. सदरच्या कामात संस्थे विरुध्द कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास त्या बाबत चौकशी करणे, अटी व शर्ती चा भंग झाल्यास योग्य ती कारवाई संस्थे विरुध्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांना असतील.

२६. सदर काम विभाग प्रमुख, महिला व बालकल्याण विभाग, कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांचे संपूर्ण नियत्रंण राहिल.

२७. सदरील प्रशिक्षणा करीता खंर्चाची कमाल मर्यादा रक्कम रु. ५ लक्ष इतकी असेल.

**१. एकूण सुरक्षा अनामत रक्कम १० % कपात करण्यात येईल. त्याचे वर्गीकरण खालील प्रमाणे :-**

**१) निविदा फॉर्म भरतेवेळी १ %**

**२) निविदा दर स्वीकृती/ कार्यादेश देताना २%**

**३) उर्वरित ७ % देयक अदा करते वेळी**

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com
Dowmloaded from SkillCouncils.com

**२. दरपत्रक करार :-**

दरपत्रक धारकांने त्यास करारपत्र मिळाल्यावर मुदतीत करारनामा नुसार काम करण्यास टाळल्यास नगरपालिका त्यांच्या विरुध्द दरपत्रकेतील अटी व शर्तीचे पालन करण्यास कसुर केली म्हणून कारवाई करण्याचा हक्क व स्विकृतीपत्र रद्द करण्याचा हक्क राखुन ठेवला आहे. दरपत्रक स्विकृती रद्द केल्यावर कंत्राटदारास कोणतेही नुकसान भरपाईची रक्कम देणे नगरपालिका बंधनकारक असणार नाही. तसेच नगरपालिका वरील प्रमाणे कारवाई केल्यावर दरपत्रक धारकांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

**३ . करारनामा रद्द करण्याबाबत सूचना :-**

१. सदर प्रशिक्षणाचे आयोजन न केल्यास किंवा अर्धवट स्थितीत सोडून दिले आहे. दरपत्रक धारकांस १५ दिवसांची नोटीस देवुन करारनामा रद्द करणेची मुभा नगरपरिषदेला राहिल, व दरपत्रक धारकांची सुरक्षा अनामत जप्त करण्यात येइल.

२. नगरपालिका व दरपत्रक धारक यांच्यात करारनाम्यातील अटी व शर्तीवरुन किंवा त्यामधील वाक्याचा अर्थ लावण्यावरुन मतभिन्नता झाल्यास किंवा वाद निर्माण झाल्यास मा.मुख्याधिकारी,कुबनप यांनी दिलेला निर्णय हा दोन्ही पक्षावर बंधंनकारक राहील.

**३. उपरोक्त कामाचा करारनामा मधील अटी व शर्ती मध्ये वित्तीय तसेच प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने बदल करण्याचे अधिकार मा.मुख्याधिकारी यांनी राखुन ठेवले आहे.**

**४. लेखा परिक्षामध्ये वसुलीपत्र रक्कम निघाल्यास ती रक्कम भरणेची जबाबदारी ठेकेदारावर राहील. त्यास नगरपरिषद जबाबदार राहणार नाही. तसेच आलेल्या दरपत्रकपैंकी एक अगर सर्व दरपत्रक कोणतेही कारण न देता अंशत पूर्णत: नाकारणेचा अगर स्विकारणेचा अधिकार न.पा. ने राखुन ठेवलेला आहे.**

**५. काही कारणास्तव कोणत्याही एकाच ठेकेदारांची दरपत्रक होत असेल, तर त्या ठेकेदारला काम देण्याचे पूर्ण अधिकार मुख्याधिकारी यांना असतील. त्या बाबत काणतेही कारण अथवा लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही.**

**६. सदरच्या कामाची आवश्यक ती माहिती महिला बालकल्याण विभागाकडे कार्यालयीन वेळेत सुट्टीने दिवस सोडून पहावयास मिळेल. वरीलच्या सर्व कामासाठी ठेकेदारास कोणती ही अग्रीम रक्कम दिली जाणार नाही.**



**मुख्याधिकारी**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**
**कुळगांव.**